
# जागतिकीकरण
# आणि
# मराठी कादंबरीतील शोषितांचे जग




संपादक
**रफीक सूरज**

सहसंपादक
**शांताराम कांबळे**
**संपतराव जाधव**
**विजयकुमार साठे**
**वैजयंता पाटील**

# जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील शोषितांचे जग

संपादक

प्रा. डॉ. रफीक सूरज

सहसंपादक

प्रा. शांताराम कांबळे

प्रा. संपतराव जाधव

प्रा. विजयकुमार साठे

प्रा. वैजयंता पाटील

प्र का श न

# जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील शोषितांचे जग

संपा. रफीक सूरज

Jagtikikaran Ani Marathi Kadambaritil Shoshitanche Jag

Editor : By Rafiq Suraj

ISBN No. : 978-93-85127-25-0

© संबंधित लेखकांकडे

प्रकाशन : २९ डिसेंबर, २०१८

प्रकाशक
दर्या प्रकाशन
सी-१४, शिवस्मृती सोसायटी, एस/आर क्र. ७७/२ सी,
भारती विद्यापीठ, कात्रज, पुणे ४११०४६.
मोबा. ०७८४१०५६३०१/०९८५०७१९६३०

मुद्रक
भारती मुद्रणालय
शाहूपुरी ४ थी गल्ली,
कोल्हापूर - ४१६००१.

मूल्य : ₹ ३००/-

# अनुक्रमणिका

१) बीजभाषण/डॉ. शोभा नाईक ........ १३
२) समकालातील निर्मिती आणि अभिव्यक्ती/प्रा. डॉ. आशुतोष पोतदार ........ २५
३) नव्वदोत्तर मराठी कादंबरीतील कृषिशोषितांचे जग/डॉ. दत्तो घोलप ........ ३३
४) १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील श्रमिकांच्या शोषणाचे चित्रण
प्रा. डॉ. शरद गायकवाड ........ ४१
५) चैत : पालवी आणि पाचोळा/प्रा. डॉ. रमेश साळुंखे ........ ५८
६) राजन खान यांच्या कादंबऱ्यांतील
शोषित स्त्रिया/प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण ........ ६४
७) मराठी कादंबरीतील भाषिक शोषण/प्रा. डॉ. गिरीश मोरे ........ ६९
८) जागतिकीकरणाच्या स्पर्श कालावधीतील कादंबरी
माझी काटेमुंढरीची शाळा/प्राचार्य डॉ. प्रकाश पाटील ........ ७७
९) जागतिकीकरणानंतरच्या काळातील गावगाड्याच्या उद्ध्वस्तीकरणाचे
दर्शन घडविणारी कादंबरी : छावणी/प्रा. एकनाथ पाटील ........ ७९
१०) जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी :
काही बरे, बरेच उणे!/प्रा. डॉ. युवराज देवाळे ........ ८६
११) पड्झड कादंबरीतील भटके विमुक्त वर्गाचे चित्रण/प्रा. शांताराम कांबळे ........ ९१
१२) समकालाचा वेध घेणारी कादंबरी : बांडगूळ आख्यान/प्रा. डॉ. यशवंत चव्हाण ........ ९५
१३) खांदेपालट या लघुकादंबरीतील बदलत्या ग्रामीण
राजकारणाचे चित्रण/प्रा. बी. एस. पाटील ........ १००
१४) एसईझेड : माणसाच्या जगण्याचं
व्यापारीकरण चितारणारी कादंबरी/डॉ. सतीश कामत ........ १०३
१५) झाडाझडती कादंबरीतील सामाजिक
समस्यांचे चित्रण/सौ. विजयालक्ष्मी वि. देवगोजी ........ १०७
१६) खेड्यापाड्यातील ग्रामस्थांची तहान :
सामाजिक प्रश्न आणि वास्तव/प्रा. वसंत बजरंग भागवत ........ १११
१७) जागतिकीकरणात शेतकऱ्याची धूळपावलं/प्रा. डॉ. लता पांडुरंग मोरे ........ ११४
१८) व्यक्ती व समाजातील मूल्यऱ्हास व शोषणकेंद्रांवर

क्ष–प्रकाश टाकणारी कादंबरी : नामशेष होणारा माणूस/डॉ. अरुण शिंदे ......... ११८
१९) जागतिकीकरणाचा अन्वयार्थ आणि फेसाटी
कादंबरीतील शोषित/डॉ. सीमा मुसळे ....................................... १२४
२०) भूमी : स्त्री जीवनाचे बदलते वास्तव/प्रा. सुनिल सदाशिव बुद्धे.................... १३०
२१) जागतिकीकरण व मराठी विज्ञान साहित्यातील
सामाजिक बदल/अजितकुमार भिमराव पाटील.................................. १३३
२२) जागतिकीकरणातील हतबल शेतकरी आणि
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट/प्रा. बाळासो आ. सुतार .................. १३६
२३) जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेली
कृषी संस्कृती आणि जोहार/प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर .................... १३९
२४) बारोमास – शेतकऱ्यांच्या बारमाही वेदनेची गाथा/प्रा. माधवी सुरेंद्र पवार ......... १४२
२५) शेतकऱ्यांच्या शोषणाची गाथा : पाडा/कुंडलिक पाटील.......................... १४६
२६) भिन्न कादंबरीचे स्त्रीवादी आकलन/प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोडा नाईक ........... १४९
२७) मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव/प्रा. ज्ञानेश्वर किसन म्हात्रे १५२
२८) रहबर कादंबरीतील स्त्री – चित्रण/प्रा. डॉ. विनोद गायकवाड/बरखा रशिद सय्यद . १५६
२९) निशाणी डावा अंगठा मधील शिक्षण क्षेत्रातील
दांभिकता व भ्रष्टाचाराचे चित्रण/डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे .................. १६०
३०) बाकी शून्य : एक मनोचिकित्सक अभ्यास/प्रा. गजेंद्र बरमू माळी ................. १६४
३१) मुस्लिम समाजाची परवड मांडणारी कादंबरी : रहबर/एफ. एन. पटेल ............ १६७
३२) जागतिकीकरणाच्या वरवंट्याखाली बदलून
गेलेला गावगाडा आणि फेसाटी/डॉ. खोत माधुरी राजाराम ......................... १७०
३३) दलित जीवनाचे वास्तववादी चित्रण : ७२ मैल/संभाजी शंकर कांबळे............. १७२
३४) चाळेगत : जागतिकीकरणावरील रोखठोक प्रतिक्रिया/डॉ. प्रिती म. पाटील ....... १७६
३५) सेझ जागतिकिकरणाचा शेतकरी जीवनावरील
परिणाम अधोरेखित करणारी कादंबरी/प्रा. डॉ. विनोद राठोड ..................... १७८
३६) मोहनदास में चित्रित सामाजिक संघर्ष/प्रा. साठे. व्ही. एल. ....................... १८२
३७) १९९० के बाद हिंदी महिला लेखन का नारी विषयक चिंतन/प्रा. मुजावर एम. एस. १८५
३८) वीरेंद्र जैन के उपन्यासों में चित्रित
किसानों का शोषण/ प्रा. सुनिल अभिमन्यू गायकवाड ........................... १९१

३९) २१वीं सदी का उपन्यास
'कस्तूरी कुंडल बसै' में नारी शोषण/डॉ. संजय पिराजी चिंदगे ...................... १९५
४०) संजीव के 'फाँस' उपन्यास में
किसानों का शोषण/प्रा. संपतराव सदाशिव जाधव ................................ १९८
४१) सेझ पीड़ित किसानों की मसीहा :
कंदील की पार्वती/प्रा. डॉ. एकनाथ श्री. पाटील ................................ २०१
४२) भूमंडलीकरण और उपन्यास/छाया शंकर माळी ................................ २०७
४३) वैश्विकरण के परिप्रेक्ष्य में डूब
उपन्यास हा मूल्यांकन/प्रा. डॉ. भास्कर उमराव भवर ............................ २१०
४४) नदी पीछे नहीं मुडती उपन्यास में नारी विमर्श/प्रा. डॉ. मिलिंद साळवे .............. २१७
४५) दोहरा अभिशाप :
दलित स्त्री के संघर्ष की गाथा/प्रा. डाँ. मुंडकर माधव राजाप्पा .................... २२१
४६) चाक उपन्यास में चित्रित
किसानों का शोषित जीवन/प्रा. डॉ. संदीप जोतीराम किर्दत ...................... २२५
४७) Ideologies : A Source of Exploitation of Woman
Dr. Uttam Ramchandra Patil ............................................................ २२९
४८) Exploring Global Aspects in
R. K. Narayan's The Financial Expert/Anagha Prakash Patil .................... २३३
४९) Cultural Aspects in Chetan
Bhagat's Two States/Vaijayanta Vijay Patil ........................................... २३६
५०) समारोप/प्राचार्य डॉ. महेंद्र कदम ............................................ २४२

# बीजभाषण

**डॉ. शोभा नाईक**
आर.पी.डी. कॉलेज, बेळगाव

जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील शोषितांचे जग या विषयावर आज आपण दिवसभर चर्चा करणार आहात. विषय तसा अगदी नवीन आहे असेही नाही. अनेक ठिकाणी यावर चर्चा संपन्न होत आहेत. पण हा विषय आजचा बिनीचा वादाचा विषय आहे हे मात्र खरे. आपल्या प्रत्येकाच्या जगण्याशी थेट संबंधित असा हा विषय आहे. विविध अंगांनी आपण दिवसभर हा विषय उलगडण्याचा प्रयत्न करणार आहात. त्यासाठी आपणा सर्वांना माझ्या शुभेच्छा. तसेच दोन वेगवेगळे विषय एकत्र घेतल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन. कारण हे शीर्षक जागतिक भांडवलशाही व्यवस्था आणि आपल्याकडील शोषितांचे जग या परस्पर विरोधी घटकांना एकमेकासमोर आणण्याची आवश्यक असणारी प्रेरणा देत आहे.

प्रस्तुत विषयाकडे पाहताक्षणी त्या अंतर्गत असणारे दोन भाग लक्षात येतात. एक जागतिकीकरण आणि दुसरा मराठी कादंबरीतील शोषितांचे जग. तर शोषितांच्या संदर्भातून जागतिकीकरणाचा विचार करू लागता सर्व प्रथम भांडवलशाही धोरणामध्ये शोषित घटकाचा विचार कसा केला जातो हाच प्रश्न उपस्थित होतो. अर्थात जागतिकीकरण हे भांडवलदार यांच्याच माध्यमातून अस्तित्वात आलेले वास्तव आहे की नाही? आर्थिक पातळी विकसित झाली की सर्व शोषितांचे एकूणएक प्रश्न सुटतील हा यामागचा विचार 'युटोपिया' ठरत आहे की काय? विश्वाच्या प्रचंड रहाटगाड्यात देश चालवायचा असतो, जग चालवायचे असते आणि त्यासाठी काही व्यवस्था, धोरणे ठरवली जात असतात, अर्थात कोण ठरवतात ही धोरणे? कोणाच्या हातात धोरण ठरवण्याचे अधिकार दिलेले असतात? आणि ते कोणी दिलेले असतात? जगाचे धोरण ठरवू पाहणारी ही शक्ती कोणकोणत्या कारणांनी अस्तित्वात आली? मग ही धोरण ठरवणारी शक्ती असते तरी काय? जगात

सगळीकडे पाहू जाता सर्व साधारण सामान्य माणसाच्या संदर्भातून दुःखांचे डोंगर निर्माण झालेले असतात मग ही आकारास येणारी धोरणे त्या दुःखांचे काय करतात? आणि आपले साहित्यिक तरी त्याचे काय करत आहेत?

आर्थिक क्रांती हे जर जागतिकीकरणाचे मुख्य ध्येय असेल तर त्याच्या मागच्या काळाच्या स्पदनांच्या मंथनांतून कोणते अमृत निघते? आधुनिक काळातील सर्वाधिक प्रभावी ठरलेला विचारवंत मार्क्स यांच्या कामगारांच्या संदर्भातून घडवण्याच्या प्रयत्नातील अर्थक्रांतीने नेमके काय साध्य केले आहे? मालकांच्या आर्थिक भांडवलाबरोबरच कामगारांच्या श्रमांचे भांडवल ही नवी संकल्पना राबवू पाहणारा मार्क्ससारखा सामाजिक आर्थिक उन्नयन साधण्यासाठी मुलभूत परिवर्तन निर्माण करणारा प्रभावी विचारवंत होऊन गेल्यानंतरही पुढची वाटचाल उत्पादन आणि ग्राहक यांच्यावर लक्ष्य केंद्रित करणारे भांडवलदार यांच्याच कब्जात जाते याचा अर्थ काय घ्यावा? भारतीय वाटचालीत निर्माण झालेले बसवेश्वर यांच्या अर्थ क्रांतीतील अध्यात्मिक बैठक आजच्या जागतिकीकरणातही विचाराधीन ठेवता येऊ शकेल इतकी समर्थ कोणत्या कारणांनी आहे? अशा अनेक प्रश्नांची गर्दी आपल्या चिंतनात या शीर्षकातून निर्माण होते.

साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध कसा असतो याचा आज वेगळा विचार केला पाहिजे असे नाही. कलांचा आणि प्रत्यक्षात जगण्याचा संबंध काय या गंमतशीर दृष्टिकोणांचा व त्यातून घडणाऱ्या मजेशीर आणि क्षुल्लक व्यवहारांचा आज विचारही करण्याचे कारण लागू नये अशी डोळस जाणीव साठोत्तरी वाटचालीतून निर्माण झाली आहे. जगभर निर्माण झालेले पर्यावरण आपल्याशी कसे व किती निगडित असते हे आजच्या ऑनलाईनवर चालत असणाऱ्या दिवसांत समजून घेण्याची परिस्थिती तर आपल्यावर कोसळलेली आहेच. एक वेगळे गोंधळात टाकणारे असे वळण जगण्यात निश्चितपणाने निर्माण झाले आहे. या भोवंडून टाकत असणाऱ्या पर्यावरणात मराठी कादंबरी कोणत्या जाणिवा उपस्थित करत आहे हा प्रश्न येथे पुढ्यात घ्यावा लागेल.

साहित्य ही माणूस या प्राण्याचे संवेदनविश्व आपल्या कवेत घेणारी मानवी जीवनात निर्माण झालेली एक प्रधान कला. अर्थात ती अनेकविध प्रकारांनी विनटलेली कला. माणूस हा विषय आपल्या केंद्रवर्ती ठेवणाऱ्या साहित्याच्या विविध प्रकारांतील कादंबरी हा सर्वाधिक ताकदीचा साहित्यप्रकार असे आपण मानतो. आधुनिक मराठी साहित्यात कादंबरी या प्रकाराला बरे दिवस आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. *यमुनापर्यटन* पासून, *पण लक्षात कोण घेतो* पासून विभावरी शिरुरकर

यांच्या *बळी* पासून *कोसला* पासून, व्यंकटेश माडगुळकर यांच्या *बनगरवाडी*, कमल देसाई यांच्या *काळा सूर्य*, शांता गोखले यांच्या *रीटा वेलिणकर* ते नामदेव व्हटकर यांच्या *बहात्तर मैल*, ढसाळांच्या *हाडकी हाडवळा* पर्यंत, रंगनाथ पठारे यांच्या *दुःखाचे श्वापद*, राजन गवस यांच्या *तणकट-भंडारभोग-ब बळीचा*, प्रवीण बांदेकर यांच्या *चाळेगत* ते भालचंद्र नेमाडे यांच्या *हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ* पर्यंत मराठी कादंबरीने नेहमी सामाजिक व सांस्कृतिक पातळीवरून अस्तित्वात आणले गेलेले शोषितांचे जग प्रातिनिधिक स्वरूपात सामर्थ्याने आविष्कृत करत आणले आहे. *हिंदू...* या कादंबरीने तर कादंबरी या साहित्य प्रकाराची कव किती महाप्रचंड असू शकते याची प्रचिती संपूर्ण भारतीय साहित्य विश्वाला दिलेली आहे. भारतासारख्या विविध भाषा धर्म संस्कृतींनी संपन्न अशा देशाची आंतरिक ऐतिहासिक अखंडता व ती विखंडित करण्याच्या हेतूने कार्यरत प्रवृत्ती कादंबरीच्या विस्तृत भाषिक अवकाशवाल्या पटात संरचित करण्याचे कार्य या कादंबरीने करून दर्शविले आहे. भारतीय जीवन व्यवहारातील सांस्कृतिक व सामाजिक पातळीचा चिकित्सक समर्थ परिवर्तनशील असा लेखाजोखा आपल्याला या कादंबरीत पाहायला मिळतो. जगण्यात निर्माण होणाऱ्या अवस्थांची त्यातील विविध प्रकारच्या शोषणाची हृदयस्पर्शी, विचाराला प्रवृत्त करणारी तपशीलवार दर्शने ही कादंबरी घडवते. सर्व प्रकारचे प्रस्थापित भेदाभेद कोणकोणत्या प्रकाराने स्त्री पुरुषांच्या मानसिकता आकारास आणतात आणि त्यांचे सभोवतालावर कसे परिणाम घडत राहतात, कधी विकृती तर कधी संस्कृती कशा पृष्ठभागावर येत राहतात त्याचे जिवंत चित्रण नेमाडे यांच्या समर्थ लेखणीवाटे मराठीत निर्माण झाले आहे. मराठी कादंबरीने इतर भारतीय भाषांतील कादंबरीलाही प्रोत्साहित केलेले आहे. मराठी कादंबरीकडून प्रेरणा प्राप्त करून कन्नड भाषेतील कादंबरी समाजवास्तवावर लक्ष्य केंद्रित करण्याचे कौशल्य मिळवत पुढे आली ही वस्तुस्थिती याठिकाणी नमूद करायला हरकत नाही. पण असे असताना आज आपल्याला तळामुळातून भोवंडून टाकणारे जागतिकीकरणाचे पर्यावरण निर्माण झालेले असताना मात्र त्याच्यातून येणारे चित्र प्रातिनिधिक म्हणावे असे अजून मराठी कादंबरीत प्रकटलेले दिसत नाही...

त्यामुळे जागतिकीकरण ज्याला आज झपाटा म्हटले पाहिजे ते नेमके आहे तरी काय या प्रश्नाचा माग आपल्याला घ्यावाच लागेल.

प्रत्येक काळाचा काही ना काही युगधर्म असतो म्हणतात. त्यानुसार आजचा युगधर्म कोणता असा प्रश्न केल्यास सगळीकडून जागतिकीकरण असेच उत्तर

येईल. पण या युगधर्मात एक गंभीर करून टाकणारा बदल घडत असल्याचे दिसते. माणूस हे केंद्र बाजूला पडून त्याठिकाणी केवळ आर्थिक नफा व त्या अनुषंगाने सत्ता हा घटक पुन्हा स्थानापन्न झाला आहे. वास्तविक जागतिकीकरण ही महाजटिल अशी प्रक्रिया आहे. ती चटकन नेमकी उलगडता येईल असे म्हणणे बरोबर होईल की नाही?

वास्तविक या जागतिकीकरणातील अर्थकेंद्री प्रक्रियेचे मूळ (जे साहित्य या पातळीवरून घडणाऱ्या जागतिकीकरणापेक्षा पूर्णतः भिन्न असते!) कुठे आहे ते पाहताना अर्थातच अमेरिका व इंग्लंड हे देश प्रामुख्याने पुढ्यात येतात. त्यांनी शोधलेल्या सायबर व माहिती तंत्रज्ञान (खढ) या गोष्टींच्या विक्रीकरिता संपूर्ण जगाची बाजारपेठ ते चिंततात. सुरुवातीपासूनच त्यांच्या प्रवृत्ती प्रसरणशील आहेत आणि त्यामागे अर्थ व सत्ता हीच मुख्य कारणे असल्याचे आढळते. इंग्लंडच्या ऐतिहासिक प्रवृत्तीमध्येच हे अंश ओतप्रोत भरलेले दिसतील. त्यांच्याकडील वडिलोपार्जित संपत्तीसंदर्भातील प्राचीन काळातील रूढ व्यवस्थांकडे पाहिले की याचा उलगडा होतो. वडिलांच्या पश्चात संपत्ती फक्त थोरल्या चिरंजीवाच्या नावावर चढत असे. तो जर बऱ्या स्वभावाचा निघाला तर इतर भावंडांची व्यवस्था त्यातून तो करत असे अन्यथा त्याने सर्वांना घरातून बाहेर हाकललेच म्हणून समजा. बापाच्या मृत्यूमुळे घराबाहेर पडावे लागलेल्या तिकडील पुत्रांनी जगावर राज्य निर्माण केले असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही! अर्थात ते राज्य मुख्यतः संपत्ती कमावण्याच्या हेतूने निर्माण केले गेले ही वस्तुस्थिती आपण लक्षात घेऊ.

* * *

जागतिकीकरणामध्ये 'खाउजा' या धोरणाचा समावेश असतो हे आपण सर्वजण जाणतोच. त्यालाच आपण 'खाउव्याजा' असे संबोधू. खाजगीकरण, उदारीकरण आणि व्यापारीकरण मिळून जागतिकीकरण अशी यातील संगती विचारात घेऊ.

जवळजवळ संपूर्ण जग जागतिकीकरणाने बाधित केले गेलेले आहे. आपणही त्यामध्ये पूर्णतः अडकलो आहोत. जागतिकीकरणांतर्गत जागतिक पातळीवरून मोठमोठे भांडवलदार आज देशादेशांतील उद्योग व्यवसाय, बाजारपेठा, समाज सेवा क्षेत्रे आपल्या कब्जात घेत असल्याचे दृश्य निर्माण झाले आहे. स्थानिक पातळीवरील छोटे छोटे उद्योजक मोठ्या अडचणीत येत आहेतच शिवाय अनेक न रोखता येईल अशी अस्तित्वासंदर्भातील काळजीत टाकणारी वास्तव चित्रे निर्माण होताहेत. जगात जिथे जिथे ही धोरणे प्रस्थापित झाली त्या त्या ठिकाणी

आज काय परिस्थिती उद्भवली त्याकडेही या लाटेचा विचार लक्षात घेताना आपण दृष्टिक्षेप टाकला तर बरे होईल. जगातील सरंजामशाहीला मोठे भगदाड पाडण्यात अग्रेसर असणाऱ्या, सर्वाधिक सुंदर अशी ख्याती असणाऱ्या खुद्द फ्रान्समध्ये आज या संदर्भातून काय ओढवले आहे? गरीब आणि कष्टकरी वर्गाच्या संदर्भातून झालेल्या क्रांतीसाठी आपण फ्रेंच राज्यक्रांती तसेच पीरिस कम्युन या ऐतिहासिक घटना विसरणेच शक्य नाही. पण आज तिथेही पुन्हा गरीब आणि कष्टकरी वर्गाकडे दुर्लक्ष होऊन केवळ उच्चवर्गाचे आर्थिक हितसंबंध जोपासण्याच्या कृती सरकारकडूनच सुरु आहेत. पण त्याचे परिणाम म्हणून त्यांना वर्गसंघर्षास सामोरे जायला लावणारी 'जिलेटस जान्स' अर्थात पिवळा जकेट नावाची चळवळ त्यांच्या रस्त्यावर सुरु झाली आहे. पेट्रोल व डिझेलवरील करवाढ रोखण्याची मागणी घेऊन सुरु झालेली ही चळवळ आता अधिक व्यापक रूप धारण करत असलेली दिसतेय. वास्तविक त्यांनी इतिहासात अत्यंत कडवा वर्गसंघर्ष केला होता, त्या तुलनेत ही चळवळ खूप सौम्य असली तरीही त्यामध्ये पुढच्या काळातील रौद्रता निश्चितपणे सामावलेली आहेच. प्रगत देशांमधील तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या या देशाला भांडवलशाही धोरणातून जाताना घटणाऱ्या राहणीमान व क्रयशक्तीला तोंड द्यावे लागत आहे. इतर सर्व पाश्चात्य देशांप्रमाणे याही देशातील गरीब आणि श्रीमंत वर्गातील दरी रुंदावलेली आहे. १९८० नंतर ही संकटे जोमदार स्वरूप प्राप्त करत आहेत. उदारीकरणाच्या परिणामातून या सर्व पट्ट्यात कायमस्वरूपी रोजगार संपुष्टात आलेला असून तो अनिश्चित कंत्राटी रोजगार बनलेला आहे. कामगारांचे घरभाडे, अन्न पुरवठा आदि मुलभूत गरजांचे प्रश्नही जटिल बनले आहेत. पण फ्रान्स या देशामधील कष्टकरी वर्ग हा सजग व क्रांतीप्रवण असल्याची साक्ष इतिहासाने वारंवार दिलेली आहे. त्यामुळे येथील लोकक्षोभ जर पेटला तर तो आटोक्यात आणण्याची वेळ तेथील शासनावर कोसळेलच पण आपल्या देशातील शतकानुशतकांची सोशिकतेची वास्तवे पाहू जाता १९८० नंतरच्या नव्या जागतिक आर्थिक धोरणांमुळे शोषितांची परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येईल. कृषीसंस्कृतीप्रधान असलेल्या या भूमीवर; जागतिकीकरणातून लादण्यात येत असलेल्या यांत्रिकीकरण व कारखानदारीकरण यांचे येथील शोषित वर्गाच्या संदर्भातून होत असणारे परिणाम केवळ साहित्यात टिपून भागणार आहे का? आणि साहित्य तरी केव्हा टिपू शकते? त्या संदर्भातील काही क्रिया प्रतिक्रिया आणि प्रतिरोध यांचे स्पंदन समाजात दिसायला नको? संपूर्ण जगात या यांत्रिकीकरणाच्या राक्षसी हल्ल्यात अधिकच घायाळ होऊन गेलेला माणूस तगवायचा असेल तर त्यावरचा

जालीम उपाय भारतीय भक्ती चळवळीच्या (सहिष्णुतादि प्रवृत्तींची परंपरा)अस्तित्वातच असल्याच्या मा. नेमाडे यांच्यासारख्या प्रज्ञावंत प्रतिभावंतांच्या शोध मोहिमा सुरु आहेत इतकेच ठळकपणे निदर्शित करता येईल. आपल्याकडील खेडी कृषीव्यवस्थेत 'राम' नाही म्हणत नगरांतील कारखान्यांकडे धावली खरी पण आज ती व्यवस्थाही कोलमडून पडली असून खूप मोठ्या गळाला लागण्याची म्हणजेच स्वतःला संपवत आणण्याची वेळ आपल्यावर येऊन ठेपली. (नेमाडे यांच्या आजीचा आशीर्वाद हयाती राहा कानात घुमतोय फक्त!)

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळून काही फार मोठा कालावधी लोटलेला नाही. देशापुढील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्यांचा निचरा करण्यासाठी जो एक निवांत आणि दीर्घ कालावधी लागतो तो या देशाच्या वाट्यास येण्याआधीच हे खाजगीकरण आणि उदारीकरण लादले जातेय की काय यावर आपल्याला चर्चा करता येईल.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक देशवासियांनी योगदाने दिली. देशाची संपूर्ण जनता सुखी समाधानी जीवनाची भोक्ती व्हावी हे स्वप्न त्या ध्येयवेड्या पिढीने बाळगले. आपले सरकार यावे म्हणजे आपल्या माणसांच्या विकासासाठीची कामे हाती घेतली जातील हा विचार तर त्या सर्व घडामोडींच्या केंद्रवर्ती होता. भारतापुढे आर्थिक समस्या जशा होत्या तसेच अनेक इतर सामाजिक विषमतेच्या समस्याही होत्या. येथे प्रस्थापित असणारे जातीभेद, स्तरभेद, वर्णभेद, लिंगभेद दूर करून एकूणच व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी सेवा उपलब्ध करण्यासाठी स्वकीय सरकार कटीबद्ध होते. अंधश्रद्ध दृष्टिकोन हटवून त्या ठिकाणी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याची ध्येयधोरणे आखण्यात आलेली होती.

पण ती सर्व स्वप्ने प्रत्यक्षात उतरण्याआधीच जागतिकीकरण देशाच्या अंगावर कोसळले. जागतिकीकरणाचे दुसरे नाव आहे व्यापारीकरण. त्यासाठीच खाजगीकरण आणि त्यासाठीच उदारीकरणही. तर या प्रकारच्या जागतिकीकरणात आपल्या देशातही कुठे आणि काय वेगळे होते आहे?

जागतिकीकरण यामध्ये ज्या ज्या समाजोपयोगी गोष्टी असतात आणि ज्याच्यासाठी शासन कटीबद्ध असते त्या सर्वच गोष्टींचे खाजगीकरण केले जातेय. अगदी लोकहितार्थ शासनाने करायच्या सर्व गोष्टीही यात समाविष्ठ असतात. खरेतर शासन वास्तविक प्रजाहितदक्ष असते, त्या तुलनेत खाजगी संस्थांकडे तसे धोरण असण्याची शक्यता नाही. मुळच्या प्रजाहित दक्षतेतून वास्तविक शासनाने आरोग्य सेवा, शिक्षण सेवा व

अन्य सार्वजनिक सोयीसुविधा अस्तित्वात आणलेल्या होत्या. पण खाजगीकरणात या सेवांनाही व्यापारी स्पर्श प्राप्त होतो. मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटले सुरू केली जातात. बहुराष्ट्रीय कंपन्या येऊन दाखल होतात. प्रचंड मॉल्स बाजारात दिमाखात उभे केले जातात. कारण उदारीकरण झालेले आहे ना! देश ही सीमा जागतिकीकरणात पुसली गेलेली आहे ना! आपण सर्व एका जागतिक खेड्याचे नागरिक बनवले जात आहोत! कोणीही कोठेही वित्तीय भांडवल निर्माण करू शकतो किंवा गुंतवणूक करू शकतो अशा व्यवस्थेत कोणीही यावे आणि आपल्या देशात व्यवसाय करावा. तर आमची भूमी सर्वांसाठी खुली केली गेलेली आहे.

गुंतवणुकदाराचा नफा हेच केवळ ध्येय राखणारी आजची व्यवस्था संपूर्ण जगाला एकाकारी बनवण्याचा नाद करत आहे. या व्यवस्थेला माणूस आपल्या कामाचा वाटत नाही. तिला ग्राहक हवा आहे. आता प्रत्येक गोष्ट ही नफा कमवणे यासाठीच असल्याचे मान्य करण्याचा युगधर्म बनवला गेला आहे. रस्त्यांसारखी सुविधासुद्धा खाजगी कंपन्यांच्या हातात सोपवली जाते. रस्ते करा, वापरा, टोलनाके बांधा आणि कमवा ही धोरणे राबवली जातात. देशाचे व्यक्तिमत्व निर्माण करण्याच्या दृष्टीतून अस्तित्वात आणलेल्या शिक्षणक्षेत्राचेही खाजगीकरण झाल्यावर 'आपला देश' किंवा 'देश बांधव' या संकल्पनांचे काय होईल? आपल्या मातृभाषांची तर अक्षम्य विल्हेवाट लावण्याचे व ग्लोबल भाषेतच प्रादेशिक पातळीवरही वावरण्याचे विडे उचलल्यावर आपल्या संवेदनविश्वाचे काय होईल? वाचन, मनन, चिंतन, लेखन, भाषण या प्रक्रिया इतिहासात जमा होत जातील!

शिक्षण आणि सर्वांगीण विकास या व यासारख्या इतर मुलभूत सेवा सामान्य माणसाला देणे हे जे शासनाचे कर्तव्य असते त्या सर्व सेवा खाजगी होऊन जातात. म्हणजे सगळ्या गोष्टी अशा खाजगी होत गेल्या की राज्यसंस्थेची तरी गरज या अर्थी शिल्लक राहील का? देशाला स्वतःचे सरकार असणे याचा अर्थ कसा लावायचा, लोकांच्या विकासापेक्षा गुंतवणूकदार व त्याचा नफा महत्त्वाचा, माणसापेक्षा ग्राहक महत्त्वाचा या बदलांना तसेच तंत्रज्ञानाचे उपयोजन नेमके कोणासाठी हा प्रश्न तर आहेच पण मानवी जीवनात जे बदल घडवले जात आहेत त्याला कसे सामोरे जायचे? तंत्रज्ञान आणि माहितीचा जो महास्फोट म्हटला जातोय तो कोणाचे हित साधतोय? याप्रकारे म्हटले तर आजच्या केवळ मराठीच नाही तर एकूणच भारतीय साहित्यिकासमोर गहन प्रश्न निर्माण होताहेत... माणसापेक्षा ग्राहक शोध हा नारा घेऊन उदारीकरण व्यापारीकरण प्रत्यक्षात उतरल्यावर दूर देशाचा व्यापारी येतो तेव्हा त्याचा ग्राहकाशी कोणत्या प्रकारचा संबंध असेल? परस्पर संबंधांतील भारतीय

अध्यात्मिक व्यवस्थेचे काय करायचे हा आपल्या लेखकांना प्रश्न पडत असेल.

जेव्हा माणसाचे ग्राहकात रुपांतर होते तेव्हा प्रत्येकजण ग्राहकाकडून नफा मिळविणे हेच ध्येय ठेवेल आणि त्याचसाठी वेगवेगळ्या युक्त्या प्रयुक्त्या शोधत राहील. अशा व्यवस्थेत मूल्य ऱ्हास तर होणारच आणि दुरुस्त न होणारा असमतोल विकास हाच जागतिकीकरणाचा पाया बनणार. बळी तो कानपिळी हे सूत्र व्यवस्थेचा कानमंत्र होणार! तेव्हा माणूस केन्द्री साहित्यात; प्रामुख्याने कादंबरीसारख्या त्याच हेतूने तपशिलांची मागणी करणाऱ्या प्रकारात जागतिकीकरण अस्तित्वात आणत असलेली भोवळ अजून म्हणावी तशी आत्मविश्वासाने चित्रित होत नाही आहे की काय?

भांडवलशाहीत घडत जाणारा मूल्यऱ्हास सर्वच बाबतीत घातक सिद्ध होतो हे विचारात घेण्याची आवश्यकता सर्वानुमते पटली की मग जागतिकीकरणाची कादंबरी यायला वेळ लागणार नाही. माणसाचे ग्राहककरण, स्त्री पुरुषांचे वस्तूकरण करताना जीवनाने शतकानुशतके प्रयत्नपूर्वक निर्माण करत आणलेली मूल्ये हास्यास्पद ठरवून ती निष्प्रभ करून सोडण्याचे प्रयत्न या व्यापारीकरणात कसे होतात हे स्पष्ट पाहण्यासाठी टी. व्ही. वरच्या जाहिरातीही पुरेत... लहान मुले, तरुण तरुणी, स्त्रिया या घटकांना केंद्र करत आपापले उत्पादन गळी उतरविले जाते. निर्णय घेण्यातील स्वातंत्र्याचे बाजारीकरण झालेले असते. व्यक्तीला सुटे बनवले की त्याला बाजारावरच निर्भर रहावे लागते ही मानसशास्त्रीय क्लुप्ती या अंतर्गत चाललेली आढळेल. स्वातंत्र्य हे फक्त तोंडी लावायचे लोणचे बनते! या संदर्भातून लहान मुले आणि स्त्रिया हा घटक तर भांडवलशाहीच्या नकळत मोठ्या प्रभावाखाली येतो... वस्तूकरणातून तसेच ग्राहकवादातून तुच्छतावादही बोकाळत सुटतो... या प्रकारातून जीवनात आणखी एक वेगळा माणसाचा शोषित वर्ग अस्तित्वात येतो!

***

आपल्या देशामध्ये नेहमी नव्या वळणांची परिस्थिती निर्माण होते तेव्हा तिची छाननी करणारे दोन परस्पर विरोधी गट उभे राहतात. एक बाजू घेतो तर दुसरा विरोध करतो. जागतिकीकरणाचेही तसेच झाल्याचे दिसते. जागतिकीकरणाचे समर्थन करणारे आणि जागतिकीकरणाला विरोध करणारे लोक असे दोन तट तयार झाल्याचे दिसते. समर्थन करणाऱ्यांना जागतिकीकरणात गरीब देश सुद्धा जास्तीत जास्त नफा मिळवू शकतो आणि नफ्यामुळे त्याचा विकास होऊ शकतो यावर विश्वास वाटतो. आणि विरोध करणाऱ्यांना नफा मिळवणारा भांडवलदार हा गोरगरिबांचा विकास करण्याऐवजी

त्यांचे शोषणच करेल असे वाटत असते. मराठी साहित्य संस्कृतीतही हा वादविवाद झडत असल्याचे चित्र पाहायला मिळते. भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, राजन गवस यांसारखे प्रतिभावंत जागतिकीकरणाच्या वास्तवाचे काय घातक परिणाम होतील व त्यातून आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आपण कोणती पावले उचलली पाहिजेत याची कल्पना सुरुवातीपासूनच देत आहेत.

पहिल्या जगात या लाटेतून निर्माण झालेले प्रश्न आपल्यासमोर आलेले आहेत. भारतातही उदारीकरण, खाजगीकरण, व्यापारीकरण यामधून असमतोल विकास शिरलेला दिसतोच आहे. मूल्य ऱ्हासाच्या कथा तर आहेतच. गरिबाने जास्ती गरीब होणे आणि श्रीमंताने जास्त श्रीमंत होणे हे येथेही घडताना आपण पाहतोच आहोत. ज्या शासनाकडे मायबाप म्हणून पाहण्याचे संस्कार होते त्यांनी आपली जबाबदारी झटकल्याचे अनुभव आहेत. मातृभाषेतून शिक्षण, उच्च शिक्षण, कायम स्वरूपी रोजगार या भेडसावणाऱ्या समस्या झाल्या आहेत. पण या परिस्थितीतून निर्माण झालेल्या चित्रांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात तसेच एकूण भारतीय साहित्यात कुठे व कसे उमटत आहे हा प्रश्न उद्भवतो!

***

केवळ आर्थिक नफा आणि त्यातून उद्भवणारा मूल्यऱ्हास हा जागतिकीकरणाचा परिणाम तसेच माणसाला कोणतेच महत्त्व द्यायचे नाही या दृढ होऊ लागलेल्या प्रवृतीलाही खतपाणी घालणारे ते जागतिकीकरणच असे मान्य केल्यावर या प्रकारचे चित्रण करणाऱ्या काही भारतीय कादंबऱ्या हाती लागू शकतील. भांडवलशाही व्यवस्थेच्या परिणामातून सामान्य माणसांचे हित विचारातच घेतले जात नाही ते कसे या पर्यावरणाचे दर्शन घडवणाऱ्या काही कादंबऱ्या उपलब्ध होऊ शकतील. *ब बळीचा* या कादंबरीचा (कोणकेरी) या दृष्टीतून विचार करता येऊ शकेल. केवळ व्यापार हेच केंद्रवर्ती असल्याने कृषीपरंपरा संपविण्याची धोरणे कशी कार्यरत होतात, समाजाची विकासाच्या संदर्भातून कशी दिशाभूल होते याचे दर्शनही (आडव्याप्पा) ही कादंबरी सामर्थ्याने घडवू पाहतेच. संवाद माध्यमांचे अत्याधुनिक तंत्रज्ञानसुद्धा कोणासाठी आणि काय काम करत आहे याचेही अधोरेखन प्रस्तुत कादंबरीच्या प्रयोगशीलतेच्या माध्यमातून केले गेलेय. *हिंदू*... ने आपला मूलगामी अस्तित्वशोध आस्थेच्या परिघात मजबूत करण्याच्या प्रेरणा प्रस्तुत केल्या आहेतच...

याप्रकारची आणखी उदाहरणे आपल्याला शोधता येतील.

वास्तविक भारतीय पारंपरिक व्यवस्थेने अस्तित्वात आणलेल्या शोषितांचे

चित्रण करणाऱ्या समर्थ कादंबऱ्या मराठीत अनेक आढळतात. पण जागतिकीकरणाच्या परिणामातील शोषितांचे (वर्गसंघर्ष, मूल्यऱ्हास, बालकांचे व स्त्रियांचे चंगळवादी वस्तूकरण) वर्तमान प्रकट करणारी मराठी कादंबरी मात्र आढळणे कठीण! तर यामागे कोणकोणती कारणे असतील याचा शोध घेणे आवश्यक ठरेल.

* * *

जागतिकीकरणानंतर शोषितांचे बदललेले वर्तमान मराठी साहित्यात कुठे चित्रित होत आहे? या प्रश्नाच्या अनुषंगाने किंवा मराठी कादंबरी जागतिकीकरणाचे आपल्याकडील शोषितांचे बदललेले वर्तमान चित्रित करत आहे का? हा प्रश्न समोर ठेवल्यावर काय दिसते त्याचा विचार करता येईल.

जागतिकीकरण म्हणजे खाउव्याजा (व्यापारीकरणासह) असे लक्षात आल्यावर आणि ते नेमके काय आहे हे नीट लक्षात घेतल्यावर इकडच्या जीवन संस्कृतीला का तिलांजली, मूल्यव्यवस्थेचा ऱ्हास किंवा माणसाने माणसांकडे पाहण्याच्या दृष्टीत बदल का घडले, जगणे अधिकाधिक भ्रष्ट का होत निघाले हे उलगडते. शिवाय आपल्या समाजात पारंपरिक व्यवस्थेने चालवलेले अनेक प्रकारचे शोषण अजूनही दूर झालेले नसतानाच याही गोष्टींचा मारा होतोय हे लक्षात येते. येथील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय पातळींवरील पारंपरिक उच्च – नीचतेच्या संकल्पनांनी ग्रस्त प्रस्थापितांच्या भूमिकेत बदल व्हावा आणि शोषितांना समान संधी प्राप्त होऊन त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीतून सुरु असणारा प्रयत्न आपल्याला कुठे घेऊन आला हे पाहण्याची उसंतही जागतिकीकरणाच्या झपाट्याने ओरबाडून घेतली असे म्हणता येईल.

जागतिकीकरणाच्या वातावरणात शोषितांचे निर्माण झालेले वर्तमान मराठी कादंबरीतच नव्हे तर एकूण गद्य प्रकारात कुठेही व्यक्त झालेले आढळत नाही. अर्थात याला अपवाद आढळतो तो कवितेचा. कविता हा साहित्यप्रकारच वर्तमानाचा हुंकार प्रकट करत असतो, त्यामुळे काही मराठीतील कवी आपल्या कवितेत जागतिकीकरणग्रस्त वर्तमानाची त्यातल्या त्यात जुजबी म्हणावी अशी संवेदना जरूर आविष्कृत करत आहेत. (महानगरीय संवेदना!!) मग गद्य प्रकारांतून मात्र याचा अविष्कार होताना अजून का दिसत नाही हा प्रश्न विचाराधीन ठेवायला हरकत नाही. कन्नड कथा वाङ्मयाने हा वर्तमान चित्रित करण्याचा सामर्थ्याने प्रारंभ केलेला आहे. तेथील स्त्रियांच्या लेखणीतून अपवादात्मक का असेना पण मुलभूत स्वातंत्र्याची

आसक्ती मुळातून शोधण्याचा प्रयत्न होतो आहे. (खूनी कोण?- वसुधेन्द्र , रोट्टी - पी. लंकेश, घाचरघोचर- विवेक शानभाग, गीता नागभूषण, वैदेही, नागवेणी... मातृत्वाचा पुनर्विचार!!/गती...)

मराठी कादंबरी सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे शोषितांचे चित्रण सामर्थ्याने करत आली. त्यामध्ये प्रामुख्याने कृषीसंस्कृतीच्या अस्वस्थ वर्तमानाचे दर्शन ही सर्वाधिक प्रकट करण्यात आलेली प्रवृत्ती विचारात घेता येईल. आणि त्याच बरोबर आपल्या सांस्कृतिक पातळीची चिकित्साही मोठ्या प्रमाणात साहित्याचे क्षेत्र कसे व्यापत आली, साठोत्तरी वाटचाल आपल्या अस्तित्वाच्या शोधाला अग्रस्थानी कसे ठेवत आली, पारंपरिक संकेत व्यवस्थेतील शोषण चालवणाऱ्या घटकांचे ती कसे अधोरेखन करत आली हे विचारात घेता येईल. आपले सगळेच उपटून टाकणारी जागतिक लाट येत असल्याचे संकेत या पिढीतील काही लेखकांनी अचूक हेरलेले होते.

बाहेरची शक्ती उपटू लागते तेव्हा ती भलेबुरे सगळेच उपटणार! त्यामुळे आपण नीरक्षीर न्याय करत आपल्यातील बुरे फक्त चिमटीत वेचून घेऊन ते उपटून दिलेले योग्य होईल हे या पिढीने करण्याचा प्रयत्न जरूर केला असल्याचे आज जागतिकीकरणाच्या आजच्या भोवंडून टाकत असलेल्या वर्तमानात आपण लक्षात घेणे महत्त्वाचे ठरेल. पण आज ही जी जागतिकीकरणाची थोपवता न येणारी लाट आलेली आहे तिच्या झपाट्यात मात्र गद्य लेखणी मूकावस्थेत रुतून बसलेली आहे. स्त्रियांच्या हातातील लेखणीही जागतिकीकरणाच्या प्रारंभकालीन छुप्या वर्चस्ववादी प्रवृतीला बळी पडलेली आहे. एडवर्ड सैद (ओरिएन्टलिझम), गायत्री स्पायवाक (सबालटर्निटी),भाभा(मिमिक्री) यांनी उलगडलेल्या वसाहतवादाच्या अंतरंगाकडे, त्यातून प्रकटत गेलेल्या छुप्या वर्चस्ववादाकडे दृष्टिक्षेप टाकला की याची कल्पना येऊ शकेल.

वसाहतवादाच्या संदर्भातील चिंतन अभ्यासल्यावर; जागतिकीकरणाचे स्वरुप स्पष्ट करत असता त्यामधील दोन टप्पे आपल्या दृष्टीस पडतात. एकूण या लाटेचे ध्येय प्रांतीय संस्कृतींचा नाश करणे, त्यांना पूर्णतः संपवणे व व्यापारीकरणाच्या माध्यमातून बलाढ्य समूहाचा वर्चस्मा प्रस्थापित करणे हे तर स्पष्ट आहेच पण या ध्येयासह सुरु झालेल्या जागतिकीकरणाचे दोन टप्पे असल्याचे ध्यानी येते. पहिल्या टप्प्याची गती धिमी होती. पण आज मात्र ती रॉकेट प्रमाणे झालेली आहे. म्हणजे जागतिकीकरण दोन टप्प्यांवरून काम करत आहे. पहिला ऐंशीपूर्व धिमी गतीवाला छुपा टप्पा आणि ऐंशी नंतरचा आजचा; प्रचंड गती प्राप्त सुसांडत निघालेला

निर्ढावलेला टप्पा. चांगले वाईट याचा विचार न करता आपण बांधलेले सर्वच्या सर्व इमले भुईसपाट करण्याची ताकद बाळगणारा हा टप्पा आपल्याला गिळंकृत करायला धजला आहे.

त्यामुळे जगणे जणू काही दृक माध्यमांचा पडदा होऊन गेले. आला क्षण गेला क्षण. विचार करायचाच नाही कशाचाही. संवेदनाच बोथट करून टाकून द्यायच्या. आता चिंतनाची परंपरा, कोहं अहम किंवा 'तत्त्वमसि'सुद्धा हे सर्वच इतिहासात गाडून टाका! अगदी साध्या शब्दात म्हणायचे तर आपली निखळ चिंतनशीलता आणि विशुद्ध चिकित्साच हरवली आहे का? मानवी जगण्यात निर्माण होणाऱ्या चंगळवादी हवसेच्या स्वरूपाचा, आभासी स्वातंत्र्याचा, कर्मांचा, कर्तव्यांचा, बदलत्या नैतिकतेचा नेमका अन्वयार्थच लावता येत नसेल तर लेखणीतून कादंबरीचा प्रसव शक्य होईल का? या झपाट्यात चिंतनशीलतेवाचून कादंबरीसारखा विस्तृत भाषिक अवकाशयुक्त साहित्यप्रकार वर्तमानातील शोषितांचे विश्व आविष्कृत करू शकतो का?

◆

जागतिकीकरणाचे स्वरुप स्पष्ट करत असता त्यामधील दोन टप्पे आपल्या दृष्टीस पडतात. एकूण या लाटेचे ध्येय प्रांतीय संस्कृतींचा नाश करणे, त्यांना पूर्णतः संपवणे व व्यापारी-करणाच्या माध्यमातून बलाढ्य समूहाचा वर्चस्मा प्रस्थापित करणे हे तर स्पष्ट आहेच पण या ध्येयासह सुरु झालेल्या जागतिकीकरणाचे दोन टप्पे असल्याचे ध्यानी येते. पहिल्या टप्प्याची गती धिमी होती. पण आज मात्र ती रॉकेट प्रमाणे झालेली आहे. म्हणजे जागतिकीकरण दोन टप्प्यांवरून काम करत आहे. पहिला ऐंशीपूर्व धिमी गतीवाला छुपा टप्पा आणि ऐंशी नंतरचा आजचा; प्रचंड गती प्राप्त सुसांडत निघालेला निर्ढावलेला टप्पा. चांगले वाईट याचा विचार न करता आपण बांधलेले सर्वच्या सर्व इमले भुईसपाट करण्याची ताकद बाळगणारा हा टप्पा आपल्याला गिळंकृत करायला धजला आहे.

**डॉ. शोभा नाईक**

प्रकाशन

ISBN 978-93-85127-25-0

9 789385 127250 >